## ।। श्रीगणेश करुणाश्लोक ।।

## (हे दयानिधे श्रीगजानना)

घोर हा नको फार कष्टलों । निजहितास मी व्यर्थ गुंतलो ।
वारिं शीघ्र संसारयातना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१।।
विषय गोड हे लागले मला । यामुळें असे घात आपुला ।
कळुनियां असें भ्रांति जाईना । हे दयानिधे श्रीगजानना ।।२।।
त्रिविध ताप हा जाळितो अती । काम क्रोध हे जाण पीडिती ।
चित्त सर्वथा स्वस्थ राहिना । हे दयानिधे श्रीगजानना ।।३।।
स्त्रीधनादि हें आठवीं मनी । छंद हाचि रे दिवसयामिनीं ।
विसरलों तुला दीनपालना । हे दयानिधे श्रीगजानना ।।४।।
माउली पिता बंधु सोयरा । तूचिं आमुचा निश्चयें खरा ।
शरण तूज मी विघ्नभंजना । हे दयानिधे श्रीगजानना ।।५।।
म्हणवितों तुझा दास या जनीं । सकळ व्यापका जाणशी मनीं ।
भुक्ति मुक्ति दे भक्तपालना । हे दयानिधे श्रीगजानना ।।६।।
काय काय रे साधनें करूं । मी असें तुझें मूर्ख लेकरूं ।
विटंबिती मला द्वैतभावना । हे दयानिधे श्रीगजानना ।।७।।
विषयचिंतनें शोक पावलों । देहबुद्धिनें व्यर्थ नाडलों ।
भालचंद्रजी तोडिं बंधना । हे दयानिधे श्रीगजानना ।।८।।

गजमुखा तुझी वाट पाहतां । नेत्र शिणले जाण तत्त्वतां ।

भेटसी कधीं भ्रमनिवारणा । हे दयानिधे श्रीगजानना ।।९।।

प्रभू समर्थ तूं आमुचे शिरीं । वेष्टिलों असें विषय पामरीं ।

नवल हेंचि रे वाटतें मना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१०।।

अगुण अद्वया तूं परात्परा । पार नेणवे विधि हरीहरां ।

अचल निर्मळा नित्य निर्गुणा । हे दयानिधे श्रीगजानना ।।११।।

जिवन व्यर्थ हें तूजवेगळें । स्वहित आपुलें काय साधिलें ।

सुख नसे सदा मोहयातना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१२।।

फारसें मला बोलतां न ये । पाऊलें तुझी देखिलीं स्वयें ।

मांडिली असे बहुत वल्गना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१३।।

दीनबंधु हें ब्रीद आपुलें । साच तूं करीं दाविं पाऊलें ।

मंगलालया विश्वजीवना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१४।।

नाशिवंत रे सर्व संपदा । हें नको मला पाव एकदा ।

क्षेम देऊनी चित्तरंजना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१५।।

जातसे घडी पळ युगापरी । लागली तुझी खंत अंतरीं ।

स्वामी आपुला विरह साहिना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१६।।

कळेंल तें करी विनविणें किती । तारिं अथवा मारिं गणपती ।

सकळ दोष अन् कष्ट नाशना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१७।।

आवडे मला त्रिभुवनाकृती । पूजुनी बरी करिन आरती ।
धांव पाव रे मोदकाशना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१८।।
हृदय कठिण तूं न करिं सर्वथा । अंत आमुचा पाहसि पूरता ।
सिद्धिवल्लभा मूषकवाहना । हे दयानिधे श्रीगजानना ।।१९।।
कल्पवृक्ष तूं कामधेनु वा । लाविजें स्तनीं जीविंच्या जिवा ।
हाचि हेत रे शेषभूषणा । हे दयानिधे श्रीगजानना ।।२०।।
तारिं मोरया दुःखसागरीं । गोसाविनंदन प्रार्थना करी ।
आत्मया मनी जाण चिद्घना । हे दयानिधे श्रीगजानना ।।२१।।

* * *